झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र.झोपुप्रा/प्रशा/१५८/२०२४
दिनांक :- 5 MAR 2024

परिपत्रक क्र. १६२ A

विषय :- प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र.१६२ नुसार सहकार कक्षाकडून सदनिका वाटप केल्यानंतर सदनिकांच्या चाव्या सहकार कक्षाकडे जमा करणेबाबत.

संदर्भ :- प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र.१६२, दिनांक २३/१०/२०१५.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून तयार झालेल्या पुनर्वसन इमारतीत संस्थेच्या मंजूर परिशिष्ट-२ मधील पात्र झोपडीधारकांना सोडत पध्दतीने सदनिका वाटप करण्यासंदर्भात परिपत्रक क्र.१६२ निर्गमित करण्यात आलेले आहे.

सदर परिपत्रकात क्रमांक १२ मध्ये वाटप करण्यात आलेल्या सदनिकांचा प्रत्यक्ष ताबा संबंधित झोपडीधारकांना विकासकांनी द्यावा, असे नमूद केले आहे. तथापि, विकासक काही झोपडीधारकांना सदनिका देण्यास टाळाटाळ करतात व काही सदनिकांमध्ये घुसखोरी होते त्याकडे विकासक दुर्लक्ष करतात, त्यामुळे पात्र झोपडीधारक त्यांच्या सदनिकेतील घुसखोरांना काढण्यासाठी पत्रव्यवहार करतात. तर काही ठिकाणी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होण्यापूर्वी झोपडीधारकांना सदनिका वाटप करुन टाकणे इत्यादी तक्रारी प्राधिकरणाकडे वारंवार येत असतात. याबाबत प्राधिकरणातर्फे पुनर्वसन सदनिकांचा ताबा झोपडीधारकांना देणे योग्य राहिल. प्राधिकरणामार्फत झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिका देण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे राहिल.

१. अभियांत्रिकी विभागातर्फे पुनर्वसन इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र दिल्यावर सर्व पुनर्वसन व सुविधा सदनिकांचा ताबा मिळकत विभागाला ७ दिवसांत देणे बंधनकारक राहिल. विकासकाने कोणत्याही झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिकाचा ताबा द्यावयाचा नाही. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन गाळयांचा ताबा प्राधिकरणामार्फत झोपडीधारकांना देण्यात येईल.

२. मिळकत विभागाने सहकार कक्षातर्फे निर्गमित झालेल्या वाटप पत्रानुसार झोपडीधारकांना त्यांचे विहित कार्यपध्दतीनुसार सदर पुनर्वसन सदनिकेचा ताबा झोपडीधारकांना द्यावयाचा आहे.

(सतिश लोखंडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण